॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची माहिती व्हावी यासाठी दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत ९ वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्कूल कनेक्ट २.०' अभियान राबविले जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत राज्यभर हे अभियान राबविले जाणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती व्हावी तसेच अभ्यासक्रम, रोजगाराच्या संधी, इंटर्नशिप, आणि शासनाच्या इतर योजना याविषयी माहिती व्हावी हा अभियाना मागचा उद्देश आहे. त्याचाच एक भाग म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने ९ वी ते १२वी च्या विद्यार्थ्यांसाठी जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यामध्ये 'स्कूल कनेक्ट २.०' अभियान राबविले जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची ऑनलाईन बैठक घेतली व या बैठकीत विस्तृत माहिती देण्यात आली.

विद्यापीठाने या आभियानासाठी महाविद्यालयांमध्ये २०० साधन व्यक्तींची कार्यशाळा सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी ऑनलाईन पध्दतीने घेतली. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे या बैठकीच्या अध्यक्षस्थान होते. प्रा. दीपक दलाल यांनी या साधन व्यक्तींना प्रशिक्षण दिले व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी काय केले पाहिजे याबद्दलची आणि विद्यार्थ्यांना या धोरणाबाबत कोणती माहिती दिली जावी याविषयी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक धोरणासोबतच विद्यालक्ष्मी कर्ज योजना, साथी पोर्टल, स्वयंमचे कोर्सेस याबद्दलची माहिती दिली जावी असेही प्रा. दलाल यांनी सांगितले. महाविद्यालयांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार बोलावून ही माहिती दिली जाणार आहे. यावेळी बोलतांना प्र-कुलगुरू प्रा. इंगळे यांनी हे अभियान विद्यापीठामार्फत चांगल्या पध्दतीने राबविले जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली. या बैठकीला प्रा. जयेंद्र लेकुरवाळे, प्रा. समीर नारखेडे, प्रा. अनिल डोंगरे, डॉ. राजेश जवळेकर , प्रा.व्ही.एम. रोकडे उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.३० (प्रतिनीधी) : राज्यशासनाने दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्याहस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात हे पुस्तक प्रदर्शन सुरु झाले आहे. यावेळी बोलतांना प्रा. इंगळे यांनी या प्रदर्शनाचा लाभ विद्यार्थी व वाचकांनी घ्यावा असे आवाहन केले. दरम्यान रविवारी ज्ञानस्त्रोत केंद्रात पूर्वतयारीचा एक भाग म्हणून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी प्रभारी संचालक विजय आहेर व सर्व अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाविषयी माहिती व्हावी यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य व ग्रंथपाल यांची ऑनलाईन बैठक प्रा. एस.टी. इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.३० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतर विद्याशाखा प्रशाळेतील शिक्षणशास्त्र विभागाच्या वतीने 'माणूसकीच्या जाणिवा' या उपक्रमांतर्गत जळगाव येथील मुलांचे निरक्षण गृह / बालगृहाला विद्यार्थ्यांनी भेट दिली.

विभाग प्रमुख डॉ. मनिषा इंदाणी यांच्या कल्पनेतून हा उपक्रम गेल्या तीन वर्षापासून राबविला जात आहे. निरीक्षण गृहातील उप अधीक्षक श्री. पाटील यांनी संस्थेविषयी माहिती देवून शंकांचे निरसन केले. विभागाच्या वतीने शेक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. यावेळी डॉ. मनीषा इंदाणी, डॉ. संतोष खिराडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. स्वाती तायडे, डॉ. रणजित पारधे यांच्यासह तीस विद्यार्थी सहभागी झाले होते. समन्वयक म्हणून संदीप वाघ यांनी काम पाहिले.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी